प्रादेशिक योजना कोल्हापूर इचलकरंजी
महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २०(४) अन्वये फेरबदल मंजूर करणेबाबत.
मौजे यड्राव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथिल स.नं.४७८, ४७९, ४८०, ४८१(पै), ४८२(पै), ४७३आ(पै) ही जमिन औद्योगिक विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२,
दिनांक :- ०५.०२.२०१०

शासन निर्णय क्रमांक टिपीएस - २१०९/१०४/प्र.क्र.१८३८/०९/नवि-१२

शासन निर्णय :- सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करावी.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(वि. स. रानडे)
अवर सचिव

प्रति,
विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
उपसंचालक नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
जिल्हाधिकारी, कोल्हापूर.
सहाय्यक संचालक नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर.
व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग-१, पुणे विभाग, पुणे पुरवणी भाग-१ मध्ये प्रसिध्द करून त्याच्या प्रत्येकी १० प्रती या विभागास, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, उपसंचालक नगर रचना, पुणे विभाग, पुणे, सहाय्यक संचालक नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर यांना पाठवाव्यात)
कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर अधिसूचना शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.
निवडनस्ती (नवि-१२).

Rapat Notification Dt.23.11.09

अधिसूचना

महाराष्ट्र शासन

नगर विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- ०४.०२.२०१०

क्रमांक-टिपीएस-२१०९/१०४/प्र.क्र.१८३८/२००९/नवि-१३

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६

ज्याअर्थी, कोल्हापूर-इचलकरंजी प्रादेशिक योजना (यापुढे "उक्त प्रादेशिक योजना" असे संबोधिलेले) शासनाने नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-आरपीके-११७६/२७८२/नवि-५, दि.२० एप्रिल १९७८ अन्वये मंजूर केली असून ती दिनांक १ नोव्हेंबर १९७८ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार मौजे यड्राव, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथील ग.नं.४७८, ४७९, ४८०, ४८१(पै), ४८२(पै), ४७३अ(पै) या जमिनी (यापुढे उल्लेख "उक्त जमिनी" असा उल्लेख करण्यात आला आहे) "औद्योगिक विभागात" समाविष्ट आहेत;

आणि ज्याअर्थी, मे.प्रथमेश डेव्हलपर्स यांनी उक्त जमिनी औद्योगिक विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्यात याव्यात अशी विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) चे कलम २० पोटकलम (२) मधील तरतुदीनुसार पुढील अटींसापेक्ष उक्त जमिनी "औद्योगिक" विभागातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याकरता उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक आहे.

अट क्र.१ - जिल्हाधिकारी, कोल्हापूर विहित करतील त्या प्राथमिक सुविधा संबंधित जमीन मालक स्वखर्चाने करतील व तशा केल्या आहेत याबाबत जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे समाधान करतील.

अट क्र.२ - मे.न्यायालय/शासनाचा प्राधिकृत अधिकारी यांचा आदेश प्राप्त झाल्यास कामगारांची देणी देण्याची पूर्तता संबंधीत सूतगिरणी/अर्जदार करेल.

(यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आला आहे)

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोटकलम (३) च्या तरतुदीनुसार उक्त फेरबदल करण्यासाठी शासनाच्या नगर विकास विभागाने क्र.टिपीएस-२१०९/१०४/प्र.क्र.१८३८/०९/नवि-१३, दिनांक २५.५.२००९ अन्वये आम जनतेच्या हरकती/सूचना मागविण्यासाठीची नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-१ पुणे विभागीय पुरवणीत दिनांक ४.६.२००९ रोजी पृ.क्र.२००३ वर प्रसिध्द केली आणि विहित मुदतीत प्राप्त सूचना हरकती दाखल करणाऱ्यांना सुनावणी देण्याकरिता व शासनास अहवाल सादर करण्याकरिता अधिकारी म्हणून सहाय्यक संचालक नगर रचना, कोल्हापूर शाखा,

कोल्हापूर, यांची नियुक्ती करण्यात आलेली होती (यापुढे "उक्त अधिकारी" असे संबोधले आहे);

आणि ज्याअर्थी उक्त अधिकारी यांच्या प्राप्त अहवालावर संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याशी [illegible] उक्त फेरबदल काही अटींसह [illegible] आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी आता उक्त अधिनियमाचे कलम २० चे पोटकलम (४) व त्या अनुषंगाने प्राप्त अधिकारान्वये शासन उक्त अधिसूचनेत उक्त फेरबदल प्रस्तावास पुढील प्रमाणे मंजुरी देत आहे व त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या दिनांक २० एप्रिल [illegible] शेवटी [illegible] नोंदीनंतर पुढील नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

नोंद

मौजे-[illegible], ता.[illegible], जि.कोल्हापूर येथील स.नं.४७८, ४७९, ४८०, ४८१(पै), ४८२(पै), ४८३अ(पै) या जमिनी खालील अटींस अधिन राहून "औद्योगिक विभागातून" वगळून "रहिवास विभागात" समाविष्ट करण्यात येत आहे.

अटी :-

अट क्र.१ - जिल्हाधिकारी, कोल्हापूर निश्चित करतील त्या प्रमाणे अधिमूल्य संबंधित जमीन मालक शासनास भरतील व तशी भरणा केल्याची पावती जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे [illegible].

अट क्र.२ - मे.न्यायालय/शासनाचा प्राधिकृत अधिकारी यांचा आदेश प्राप्त झाल्यास आवश्यकतेनुसार [illegible] पूर्तता संबंधीत जमीनमालक/अर्जदार करेल.

टिप :-

अ) उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा टिपीएस २१०९/१०४/प्र.क्र.१८३८/०९/नवि-१३, नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेमध्ये खाली नमूद केलेल्या कार्यालयामध्ये ठेवण्यात आला आहे.

१. उपसंचालक नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

२. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

३. सहाय्यक संचालक नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर.

ब) सदर फेरबदलाची अधिसूचना शासनाच्या [illegible] वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(कि.म.[illegible])

शासनाचे अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

NOTIFICATION

Government of Maharashtra
Urban Development Department,
Mantralaya, Mumbai 400 032.
Date- 04.02.2010
No.TPS-2109/104/CR-1838/2009/UD-13

Maharashtra Regional & Town Planning Act 1966.

Whereas, the Regional Plan of "Kolhapur Ichalkaranji Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") has been sanctioned by Government in, Urban Development & Public Health Department vide its Notification No. RPK-1176/2782/UD-5 dated 30th April, 1978 and has come into force with effect from 1st Nov. 1978;

And whereas, as per the proposals of the said Regional Plan the land bearing Gat No.478, 479,480, 481(pt), 482(pt), 473 A(pt) of village Yadrav,Taluka Shirol,Dist.Kolhapur is included in "Industrial Zone"(hereinafter referred to as "the said land");

And whereas M/s.Prathamesh Developers has requested to change the zonning of the said land from "Industrial Zone" to "Residential Zone";

And whereas, Government of Maharashtra is of the opinion that it is necessary to change the zoning of the said lands from "Industrial Zone" to "Residential Zone" under sub section (2) of section 20 of the Maharashtra Regional & Town Planning Act 1966 (hereinafter referred to as the said Act) subject to following conditions.

Conditions:-

1. Owner of the land shall provide the necessary infrastructure facilities/amenities as may be specified by the collector & up to the satisfaction of the collector, Kolhapur.

2. Any orders from the Hon'ble Court/Govt.officer in respect of the dues payable to labours of Soot Girani shall be binding on concerned Soot Girani/Applicant.

(hereinafter referred to as "the said modification")

And whereas, the notice regarding the proposed modification under sub section (3) of section 20 of the said Act inviting suggestions/objections from General Public vide Urban Development Department's Notice No. TPS-2109/104/CR-1838/09/UD-13 dated 27.5.2009 was published, which appeared in Maharashtra Government Gazette Part-I, Pune dated 4.6.2009 at page No.2003. The Assistant Director of Town Planning, Kolhapur Branch, Kolhapur was appointed as an officer by Government to hear suggestions/objections and submit his report to Government (hereinafter referred to as "the said officer")

And whereas, after considering the report submitted by the said Officer and consulting the Director of Town Planning Maharashtra State, Pune, Govt. is of the opinion that Zoning of the said land shall be changed from "Industrial Zone" to "Residential Zone" with certain conditions;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (4) of section 20 of the said Act, the Government hereby finally sanctions the said modification proposal and modifies the notification sanctioning the said Regional Plan; for that purpose after the last entry the new entry is added in the schedule of Modifications appended to the Notification dated 20th April, 1978 sanctioning the said Regional Plan as follows:-

ENTRY

Land bearing Gat No.478, 479, 480, 481(pt), 482(pt), 473 A(pt) at village Yadrav, Taluka Shirol, Dist.-Kolhapur is deleted from "Industrial Zone" and is included in "Residential Zone" subject to following Conditions;

Conditions:-

1. Owner of the land shall provide at his own cost the necessary infrastructure facilities/amenities as may be specified by the collector & up to the satisfaction of the collector, Kolhapur.

2. Any orders from the Hon'ble Court/Govt.officer in respect of the dues payable to labours of Soot Girani shall be binding on concerned Soot Girani/Applicant.

Note :-

A. The plan bearing No.TPS-2109/104/CR-1838/09/UD-13, showing the said draft modification is available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices.

1. The Deputy Director of Town Planning, Pune Division, Pune, S.No. 74/2, Sahakar Nagar, Above Bank of Maharashtra, Pune-9.
2. The Collector of Kolhapur.
3. Assistant Director of Town Planning, Kolhapur Branch, Kolhapur.

B. This notification is also published on government web site at www.urban.maharashtra.gov.in

By order and in the name of the Governor of Maharashtra,

(V.M. Ranade)
Under Secretary to Government